Cosmos Multidisciplinary Research E-Journal
Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal
Impact Factor 5.3
ISSN No. 2456-1665

# सावित्रीमाई फुले - मानवी हक्कांचा लढा उभा करणारे संवेदनशील व्यक्तिमत्त्व

डॉ राजीव आबाराव काळे
९४२२४८८४६६

शूद्रांना सांगण्याजोगा। आहे शिक्षणमार्ग हा

शिक्षणाने मनुष्यत्व। पशुत्व हाटते पहा’ (शूद्रांचे दुखणे)

‘विद्या हे धन आहे रे। श्रेष्ठ साऱ्या धनाहून

तिचा साठा जयापाशी। ज्ञानी तो मानती जन’ (श्रेष्ठ धन)

‘उठा बंधूंनो अतिशूद्रांनो, जागे होऊन उठा

परंपरेचि गुलामगिरी ही तोडणेसाठी उठा

बंधूंनो, शिकण्यासाठी उठा ’ (शिकण्यासाठी जागे व्हा)

संबंध मानवजातीच्या उद्धारासाठी माता सावित्रीमाई फुले यांनी हा मूलमंत्र दिला आहे. यामध्येच ख-या अर्थाने बहुजनांचे कल्याण दडलेले आहे. परंतु आज ही हा समाज या विचारांपासून दूर आहे. क्रांतिसूर्य महात्मा जोतीराव फुले, क्रांतिज्योती सावित्रीमाई फुले यांचे आयुष्य याच लढ्यासाठी समर्पित झाले आहे. सावित्रीमाईचे कार्य महान होते हे सांगण्याची वा पुरावा देण्याची गरज नाही. कारण माता सावित्रीमाई फुले यांच्यामुळेच महात्मा जोतीराव फुले मिळाले नव्हेतर त्यांना महात्मा होता आले. सावित्रीमाईचे ओळख केवळ पहिल्या महिला शिक्षिका एवढ्यापुरतीच मर्यादित नाही. तर त्यांच्या कार्याचा परिघ

विशाल आहे. क्रांतिकारक, सामाजिक क्रांतीच्या प्रणेत्या, काळाच्या पुढे जाऊन दुरदृष्टी असलेल्या संवेदनशील वैचारिक व्यक्तिमत्त्व म्हणुन त्या दिशादर्शक आहेत. महात्मा जोतीराव फुले यांच्या पुढे जाऊन लेकीच्या माध्यमातून मानवी हक्कांची भाषा त्या मांडतात.

१८७६ व १८९६ दोन मोठ्या दुष्काळाला सामोरे जातांना सावित्रीमाई सत्यशोधक चळवळीतील कार्यकर्त्यांना सोबत घेऊन गावोगावी लोकांना अन्नधान्य पुरविण्याचे काम करत होत्या. अशा परिस्थिती मध्ये सावकार शेतकऱ्यांना लुटतात, अशा वेळी इंग्रज अधिकाऱ्यांना धारिष्ट्य दाखवुन शेतक-यांच्या न्यायासाठी सावित्रीमाई महात्मा जोतीराव फुले तिथे नसतांना लढत होत्या. हा निडरपणा, विद्रोह, नेतृत्व आणि संवेदनशीलता महाराष्ट्रातील पुरोगामी चळवळीला बळ देत आहे.

त्या काळात होत असलेल्या स्त्री अन्याय, अत्याचाराविरोधात माता सावित्रीमाई लढत असत. काही कामानिमित्त जोतीराव फुले बाहेर गावी गेले तर सर्व वृत्तांत त्यांना पत्राने कळविला जात असे. पत्रव्यवहार हा त्यांचा वैचारिक देवाणघेवाण करण्याचा भ्रमणध्वनी होता. त्यातून सावित्रीज्योती हे एकमेकांना समजून घेणारे आणि जीवापाड प्रेम करणारे जोडपे होते हे लक्षात येते. आपल्या वैचारिक मांडणीतून काळाला प्रश्न पडावेत असे विचार पुढे आहे. आज पडलेल्या प्रश्नांची सोडवणूक माता सावित्रीमाई यांनी करून ठेवलेली दिसते. स्त्री संरक्षणाबाबत सावित्रीमाई यांचा विशेष भर होता. त्यासाठी शिक्षण हेच शस्त्र त्यांनी दिले. म्हणुनच आज प्रत्येक क्षेत्रात स्त्री दिसते त्याचे श्रेय सावित्रीमाई यांचे आहे. आज अनेक वृत्तपत्रांची मथळे असतात की, आंतरजातीय विवाहामुळे नवदाम्पत्याला आयुष्यातून उठावे लागते. कधी जात पंचायत, खापपंचायत या व्यवस्था आज ही मजबुत पणाने उभ्या आहेत.

पण यांचे दुष्परिणाम वैवाहिक जीवनात होतांना दिसतात. तत्काळात असे प्रकार घडत होते परंतु त्यांना विरोध करण्याचे धाडस सावित्रीमाई यांनी दाखविले आहे. ऑनर किलिंग घराण्याच्या प्रतिष्ठेसाठी केल्या जाणाऱ्या हत्या आजही होत आहेत. विवाहाच्या कधीचं मातृत्व आजही कलंकित आहे. देशातील अनाथाश्रम प्रामुख्याने अशा अविवाहित मातृत्वातून जन्माला आलेल्या संमतीनेच भरले आहेत. त्यावेळी अशा गोष्टींची शिक्षा मृत्युदंड असणे नवल वाटण्यासारखे नाही. परंतु अशा अनाथ मुलांच्या सावित्रीमाई माता झाल्या. अशा जातपंचायत मध्ये जाऊन मत परिवर्तन करण्याचा प्रयत्न केला. आतंरजातीय विवाहाला प्रोत्साहन दिले. आतंरजातीय प्रेम या गोष्टींकडे सावित्रीमाई गुन्हा म्हणुन पाहत नाहीत. त्या तरूण, तरूणीला कलंकित मानत नाहीत.

कुटुंबाच्या उंबरठ्यावरील विरोध पत्कारून जोतीराव साथ देण्याचे त्यांचे वचन आहे. भाऊ, वडील कोणी बोलले तर त्याचा राग कधीच मानला नाही. उलट त्यांचे मत परिवर्तन करण्याचा प्रयत्न त्यांनी केला. विद्याहीनता ही पशुत्वाची खुण आहे असे त्यांचे मत आहे. जातीव्यवस्थेने नाकारलेल्या गावाकुसाबाहेरील लोकांना शिक्षण दिले यात अनुचित काय? असा सवाल त्यांनी मानव जातीला विचारला. हे काम करतांना मला आनंद मिळतो. या कामायोगे मला परमानंद होतोच. टिकेला न घाबरता हाती घेतलेले काम करत रहावे असा कर्मसिध्दांत त्यांनी दिला. मानवता धर्म मानणाऱ्या सावित्रीमाईचं हे कर्म विचार प्रेरक आहेत. समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि सामाजिक न्याय हे तत्त्व फुले दाम्पत्याच्या विचाराने जगाला मिळाले.

१८९६-९७ प्लेग साथीच्या रोगात माणसं प्राण सोडतो होती. परंतु स्वतः च्या प्राणांची बाजी लावुन गावाकुसाबाहेरील मुलांचे प्राण वाचले पाहिजे म्हणुन त्याला यशवंत च्या दवाखान्यात पोहोचविण्यासाठी घेऊन जातांना सावित्रीमाई ला प्लेगची लागण झाली. १० मार्च १८९७ ला त्यांचे निधन झाले.

संदर्भ:-

१)साविज्ञीबाई फुले - जी. ए. उगले

२) सावित्रीबाई फुले - अभय सदावर्ते